मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 21 मार्च 2025 | पान- 1

# आकाशचिन्ह विभागाला अवघे 16 कोटींचे उत्पन्न

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागाच्या उत्पन्नात दरवर्षी वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागाच्या उत्पन्नात दरवर्षी वाढ होते. परंतु, चालू आर्थिक वर्ष संपत आले असताना अपेक्षित उत्पन्न गाठता आलेले नाही. यावर्षी या विभागाच्या तिजोरीत आज अखेर फक्त १६ कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. येत्या ३१ मार्चअखेर १८ कोटी वसूल करण्याचे उद्दिष्ट आकाशचिन्ह व परवाना विभागासमोर आहे. शहरातील प्रत्येक रस्ता, प्रत्येक चौक वेगवेगळ्या होर्डिंग, बॅनर आणि फ्लेक्सने वर्षभर भरलेला असतानाही पालिकेला मात्र अवघ्या १६ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे.



राजकीय पुढाऱ्यांचे वाढदिवस, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक यासह इतर कार्यक्रमांसाठी जाहिरात करण्यास प्राधान्य दिले जाते. अनेक राजकीय पुढारी आणि व्यावसायिक परवाना न घेताच अनधिकृत फलक लावत असतात. एकाच परवाना नंबरवर अनेक जाहिरात फलक असण्याची शक्यताही आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात १७ कोटींचे उद्दिष्ट होते आणि आकाशचिन्ह विभागाला १८ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले होते. परंतु, चालू आर्थिक वर्ष संपत आले असताना फक्त १६ कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे.

त्यात फक्त होर्डिंगधारकांकडून ८ कोटी ८१ लाख रुपये मिळाले आहेत. होर्डिंग आणि फ्लेक्सने गजबजलेल्या या शहरात सद्यःस्थितीत केवळ १ हजार २४१ मोठे अधिकृत जाहिरात फलक आहेत. या फलकांच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत उत्पन्न जमा होत आहे. दुसरीकडे शहराच्या प्रत्येक चौकात आणि प्रत्येक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत जाहिरात फलक दिसून येत आहेत. विभागाच्या संथ कारभारामुळे यावर्षी होर्डिंग नूतनीकरणाची प्रक्रिया रखडली. त्यातून उत्पन्नात घट झाल्याचे दिसून येत आहे.

शहरात सध्यस्थितीत एक हजारांहून अधिक मोठे जाहिरात फलक अधिकृत आहे. जाहिरात फलक लावण्यासाठी ८०४ अर्जांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. तर ३४ अर्ज प्रलंबित आहेत. ७० जणांनी अद्याप नूतनीकरणासाठी अर्ज केले नाहीत.

> आकाशचिन्ह विभागाच्या वतीने गेल्या काही दिवसांत अनधिकृत जाहिरात फलकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. बाह्य जाहिरात धोरण निश्चित करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात १७ कोटींचे टार्गेट असताना १८ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. आगामी आर्थिक वर्षात १९ कोटीचे उदिष्ट देण्यात आले आहे. अनधिकृत फलकांवर कारवाई पुन्हा सुरू करणार आहोत.
>
> **- प्रदीप ठेंगल, सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पिंपरी चिंचवड पोलिसांनी 683 किलो गांजा केला नष्ट

## मुख्यमंत्र्यांनी सर्व शासकीय विभागात सात कलमी कार्यक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलिसांनी मागील काही महिन्यांत केलेल्या ५२ कारवायांमधील ६८३.८३० किलो गांजा नष्ट केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत ही कारवाई करण्यात आली असल्याचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व शासकीय विभागात सात कलमी कार्यक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये शासकीय सेवा नागरिक केंद्रित करण्यावर आणि शासकीय कार्यालयातील



प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे, स्वच्छता आदींचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मागील काही महिन्यांमध्ये गांजा विक्री, बाळगल्या प्रकरणी मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या आहेत. त्या कारवायांमध्ये जप्त केलेला गांजा साठवून ठेवण्यात आला होता.

अमली पदार्थ नष्ट करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) विवेक पाटील, पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांच्या प्रतिनिधी पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार केले आहे. या पथकाने ५२ गुन्ह्यात जप्त केलेला ६८३.८३० किलो गांजा नष्ट करण्याबाबत कायदेशीर बाबी पूर्ण केल्या. रांजणगाव एमआयडीसी मधील महाराष्ट्र एन्व्हायरो पावर लिमिटेड या कंपनीत फॉरेन्सिक लॅब पुणे, राज्य उत्पादन शुल्क पुणे आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणे यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत गांजा नष्ट केला.

ही कारवाई अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील, सहायक पोलीस निरीक्षक सचिन कदम, सहायक पोलीस निरीक्षक राजेंद्र बांबळे, पोलीस कॉन्स्टेबल किशोर परदेशी, मयूर वाडकर, शिल्पा कांबळे, निखिल शेटे, संतोष स्वामी, सदानंद रुद्राक्षे, रणधीर माने, कपिलेश इगवे यांनी केली.

# मिनीमंत्रालयाचा 292 कोटींचा अर्थसंकल्प

## महानगरपालिकेत 34 गावांचा समाविष्ट झाल्याने ऐंशी कोटी रुपयांचा निधी घटला

**पुणे | प्रतिनिधी**

मिनीमंत्रालय समजल्या जाणाऱ्या पुणे जिल्हा परिषदेचा 2025-26 या वर्षाचा 292 कोटी 75 लाख रुपयांचा अर्थसंकल्प बुधवारी (दि.19) मांडला. मुद्रांक शुल्क तसेच जलसंपदा विभागाकडे थकीत पाणीपट्टीपोटी मिळणाऱ्या रकमेमुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात 58 कोटी रुपयांची वाढ झाली असली तरी पुणे महानगरपालिकेत 34 गावांचा समाविष्ट झाल्याने तब्बल ऐंशी कोटी रुपयांचा निधी घटला असल्याचे वास्तव समोर आले आहे.

प्रामुख्याने शाळा सुधारणा, प्राथमिक आरोग्य केंद्राचे सक्षमीकरण, अंगणवाड्यांसाठी सोलर पॅनेल, लघु पाटबंधारे, फेलोशिप योजना आदींचा अर्थसंकल्पात समावेश केला आहे.




जिल्हा परिषदेने मुख्य वित्त लेखा अधिकारी विशाल पवार यांनी 2025- 26 या वर्षाचा अर्थसंकल्प हा मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रशासक गजानन पाटील यांच्याकडे सादर केला. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सल्लागार समितीकडे प्रशासक पाटील यांनी हा अर्थसंकल्प समितीपुढे मांडला आणि त्याला मंजुरी देण्यात आली.

या वेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात, वित्त लेखा अधिकारी विशाल पवार, उपमुख्य वित्त लेखा अधिकारी अभिजित पाटील, सहायक लेखाअधिकारी जितेंद्र चासकर, याशिवाय विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून जिल्हा परिषद फेलोशिप योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत प्रायोगिक तत्त्वावर विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. त्यांना दरमहा 25 हजार रुपयांचे मानधन दिले जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामाचा अनुभव घेता येणार आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता आणि शिस्तीसाठी सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहे. शाळेच्या सक्षमीकरणांतर्गत शिक्षकांसाठी बायोमेट्रिक फिंगरप्रिंट किंवा फेसरीडिंग हजेरी प्रणाली सुरू करण्याचा मानस आहे.

> जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश भाषांचे ज्ञान असलेल्या शिक्षकांमार्फत सध्या धडे दिले जात आहेत. त्यामुळे आता जास्त विद्यार्थी पटसंख्या असणाऱ्या शाळांमध्ये या भाषेच्या खासगी संस्थांची मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यातील अनेक समाज मंदिरे ओस पडली आहेत. त्याठिकाणी चुकीचे कृत्य सुरू असतात. त्यामुळे त्या ठिकाणी आता ग्रंथालये करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी 223 समाजमंदिरांचे ज्ञानमंदिरात अर्थात ग्रंथालयात रूपांतर झाले. आता पुन्हा 450 समाजमंदिरांचे ज्ञानमंदिरात रूपांतर करण्याचे नियोजन आहे. जिल्ह्यातील 303 शाळांचे मॉडेल स्कूलमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.
>
> **- गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद.**

# संशोधनाला निधी देण्यात विद्यापीठाचा हात आखडता

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा 22 मार्च रोजी होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध क्रमवारींमध्ये संशोधनाला महत्त्व असतानाही संशोधनासाठी निधी देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा हात आखडता आहे. विद्यापीठाने अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीचा पुरेपूर वापर होत नसल्याचे दिसून येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा २२ मार्च रोजी होणार आहे. त्यासाठीची कार्यक्रमपत्रिका अंतिम करण्यात आली आहे. अधिसभेसाठी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी उत्तरे दिली आहेत. त्यात विद्यापीठाकडून संशोधनासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाबाबत शंतनू लामधाडे, डॉ. प्रशांत हिरे, डॉ. नीता मोहिते यांनी प्रश्न विचारले आहेत. या प्रश्नांना डॉ. संगीता जगताप, डॉ. नितीन घोरपडे यांनी उत्तरे दिली आहेत.



विद्यापीठाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात मिळालेल्या अनुदानानुसार १२७ संशोधन प्रकल्प मिळाले. तसेच ॲस्पायर रीसर्च मेन्टॉरशीप प्रोग्रॅम योजनेअंतर्गत १० प्राध्यापकांना १० लाख २८ हजार ५०० रुपये अनुदान मंजूर करण्यात आले. विद्यापीठाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात संशोधन अनुदानासाठी ४ कोटी ९० लाख रुपये तरतूद केली होती. विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांना विद्यापीठामार्फत अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे १ कोटी ४० लाख रुपये, तसेच विविध संस्थांकडून २५ कोटी ७५ लाख १५ हजार ४५७ रुपये अनुदान मिळाले.

विद्यापीठाने महाविद्यालयीन स्तरावरील संशोधनाला वाव देण्यासाठी अर्थसंकल्पात ३ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद केली होती, त्यापैकी २ कोटी २६ लाख ६ हजार ६४९ रुपयांचाच निधी वितरित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्याशिवाय विद्यापीठाकडून ॲस्पायर योजनेअंतर्गत २०२१-२२मध्ये ३७ लाख २१ हजार ८४४, २०२२-२३मध्ये ३५ लाख ४२ हजार ७२४ रुपये, २०२३-२४मध्ये ४ लाख ६८ हजार ७१ रुपये, तर २०२४-२५मध्ये २ कोटी २६ लाख ६ हजार ६४९ रुपये महाविद्यालयांना देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता प्रस्ताव प्रलंबित

**» डॉ. राजेश मणेरीकर यांनी पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता प्रलंबित प्रस्तावांबाबत विचारलेल्या प्रश्नाला व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी उत्तर दिले आहे. त्यानुसार विद्यापीठाकडे मान्यतेसाठी एकूण २६४ प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यात विज्ञान शाखेचे १६०, वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेचे ५९, अभियांत्रिकी शाखेचे ३६, तर आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेच्या नऊ प्रस्तावांचा समावेश आहे.**

# पीएमआरडीए वापरणारएआय टूल्स ; नवीन प्रकल्पांत वापरणार डिजिटल ट्वीन संकल्पना

**प्रकल्पामध्ये आधुनिकरणाची सांगड घालून एक नवा पायंडा पाडत आहेत, परिणामी, प्रकल्पाबरोबरच इतर विकासकामांचा दर्जा आणि त्यामध्ये अचूकता येण्यास मदत होईल.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाने प्रकल्पामध्ये आधुनिकरणाची सांगड घालून एक नवा पायंडा पाडत आहेत. परिणामी, प्रकल्पाबरोबरच इतर विकासकामांचा दर्जा आणि त्यामध्ये अचूकता येण्यास मदत होईल. प्रकल्प उभारताना अचूक नियोजन, जागेची टॉपोग्राफी, जमिनीची उपलब्धता, कामामधील संभाव्य त्रुटी दूर करणे आणि प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी सिव्हिल थ्रीडीसारख्या अद्ययावत यंत्रणेची मदत घेतली जाणार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजंन्स अर्थात संगणकीय आणि ड्रोनद्वारे होणाऱ्या मोजमापमुळे प्रकल्पात कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत.

प्रकल्पाबाबत वेगवेगळ्या प्रकारचे आरोपदेखील झाले आहेत. त्यामुळे एकूणच नागरिकांच्या मनामध्ये प्राधिकरणाच्या प्रकल्पावरती संशय निर्माण होऊ लागला आहे. हाच दृष्टिकोन बदलण्यासाठी नव्या येणाऱ्या आधुनिकीकरणाची सांगड घालत 'डिजिटल ट्वीन' अंमलात आणण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या मिशन संगमअंतर्गत सर्वाधिक डिजिटल आणि मानवविरहित सिस्टीमअंतर्गत काम चालणार आहे. यामुळे भूखंड वाटप आणि त्याच्या नियोजनाचे समस्यांची निराकरण अचूक होणार आहे. वेगवेगळे प्रकल्प आणि एकूण नियोजनामध्ये या आर्टिफिशल इंटेलिजंट टूल्स याचा वापर करता येणार आहे. या माध्यमातून संबंधित कंत्राटदार आणि अधिकारी यांच्यामध्ये समन्वय राहणार आहे. या माध्यमातून टाऊन प्लॅनिंग, टॉपोग्राफी, पॉप्युलेशन फोरकास्ट, फायर फायटिंग स्टेशन यासाठी वापर करता येऊ शकतो

प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या शेकडो एकर जमिनीबाबत ही नवी यंत्रणा मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरणार आहे. प्रकल्प उभा करताना जमिनीची एकूण उपलब्धता, त्याचे खाचखळगे, पावसाचे साचणारे पाणी, पाण्याचा निचरा, प्रवाहाची दिशा, प्रकल्पातील येणाऱ्या अडचणी आणि प्रकल्पासाठी लागणारा वेळ या सर्व बाबी अचूकपणे सांगणार आहेत. त्यामुळे शासनाची पैसा आणि वेळेची बचत होणार आहे.




### अभियंते, कर्मचारी प्रशिक्षित

» ही योजना अंमलात आणण्यापूर्वी दोन महिन्यांपासून अभियंते, कर्मचारी यांचे विशेष प्रशिक्षण सुरू होते. या योजनेतील बारकावे, कामाची पद्धत आणि प्रकल्पावरती होणारे फायदे तोटे याविषयी माहिती देण्यात आली. प्रशिक्षणअंतर्गत 15 अभियंते प्रशिक्षित झाले असून, पीएमआरडीएच्या नव्या प्रकल्पांमध्ये हे अभियंत एआय टूल्सचा वापर करू शकतील.

### समस्यांचे अचूक निराकरण

» पीएमआरडीएअंतर्गत जवळपास ८०० गावांचा समावेश आहे. गेल्या अनेक वर्षांमध्ये जिल्ह्यात वेगवेगळ्या माध्यमातून विकासकामे आणि प्रकल्प उभारण्यात आले. हे प्रकल्प उभारताना काही त्रुटी राहिल्या आहेत. तसेच, प्रकल्पाबाबत वेगवेगळ्या प्रकारचे आरोपदेखील झाले आहेत. त्यामुळे एकूणच नागरिकांच्या मनामध्ये प्राधिकरणाच्या प्रकल्पावरती संशय निर्माण होऊ लागला आहे. हाच दृष्टिकोन बदलण्यासाठी नव्या येणाऱ्या आधुनिकीकरणाची सांगड घालत 'डिजिटल ट्वीन' अंमलात आणण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या मिशन संगमअंतर्गत सर्वाधिक डिजिटल आणि मानवविरहित सिस्टीमअंतर्गत काम चालणार आहे. यामुळे भूखंड वाटप आणि त्याच्या नियोजनाचे समस्यांची निराकरण अचूक होणार आहे.

### ..असे चालेल काम

» वेगवेगळे प्रकल्प आणि एकूण नियोजनामध्ये या आर्टिफिशल इंटेलिजंट टूल्स याचा वापर करता येणार आहे. या माध्यमातून संबंधित कंत्राटदार आणि अधिकारी यांच्यामध्ये समन्वय राहणार आहे. या माध्यमातून टाऊन प्लॅनिंग, टॉपोग्राफी, पॉप्युलेशन फोरकास्ट, फायर फायटिंग स्टेशन यासाठी वापर करता येऊ शकतो. यामुळे प्रकल्पाच्या खोलीपासून ते मलनिस्सारण वाहिनीची मोजमापे अचूकपणे घेता येतील. परिणामी प्रकल्पातील अडचणी, निकृष्टपणा, संभाव्य धोके या अद्ययावत यंत्रणेमुळे टळणार आहेत.

# आकाशचिन्ह विभागाला अवघे 16 कोटींचे उत्पन्न

**शहरातील प्रत्येक रस्ता, प्रत्येक चौक वेगवेगळ्या होर्डिंग, बॅनर आणि फ्लेक्सने वर्षभर भरलेला असतानाही पालिकेला मात्र अवघ्या 16 कोटींचे उत्पन्न मिळाले आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागाच्या उत्पन्नात दरवर्षी वाढ होते. परंतु, चालू आर्थिक वर्ष संपत आले असताना अपेक्षित उत्पन्न गाठता आलेले नाही. यावर्षी या विभागाच्या तिजोरीत आज अखेर फक्त १६ कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. येत्या ३१ मार्चअखेर १८ कोटीं वसूल करण्याचे उद्दिष्ट आकाशचिन्ह व परवाना विभागासमोर आहे. शहरातील प्रत्येक रस्ता, प्रत्येक चौक वेगवेगळ्या होर्डिंग, बॅनर आणि फ्लेक्सने वर्षभर भरलेला असतानाही पालिकेला मात्र अवघ्या १६ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे.

राजकीय पुढाऱ्यांचे वाढदिवस, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक यासह इतर कार्यक्रमांसाठी जाहिरात करण्यास प्राधान्य दिले जाते. अनेक राजकीय पुढारी आणि व्यावसायिक परवाना न घेताच अनधिकृत फलक लावत असतात. एकाच परवाना नंबरवर अनेक जाहिरात फलक असण्याची शक्यताही आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षांत १७ कोटींचे उद्दिष्ट होते आणि आकाशचिन्ह विभागाला १८ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले होते. परंतु, चालू आर्थिक वर्ष संपत आले असताना फक्त १६ कोटींचे उत्पन्न जमा झाले आहे. त्यात फक्त होर्डिंगधारकांकडून ८ कोटी ८१ लाख रुपये मिळाले आहेत. होर्डिंग आणि फ्लेक्सने गजबलेल्या या शहरात सद्यःस्थितीत केवळ १ हजार २४१ मोठे अधिकृत जाहिरात फलक आहेत. या फलकांच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत उत्पन्न जमा होत आहे. दुसरीकडे शहराच्या प्रत्येक चौकात आणि प्रत्येक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत जाहिरात फलक दिसून येत आहेत. विभागाच्या संथ कारभारामुळे यावर्षी होर्डिंग नूतनीकरणाची प्रक्रिया रखडली. त्यातून उत्पन्नात घट झाल्याचे दिसून येत आहे.




### नूतनीकरणाचे 70 होर्डिंगधारकांकडून अर्ज आले नाहीत

» शहरात सध्यस्थितीत एक हजारांहून अधिक मोठे जाहिरात फलक अधिकृत आहे. जाहिरात फलक लावण्यासाठी ८०४ अर्जांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. तर ३४ अर्ज प्रलंबित आहेत. ७० जणांनी अद्याप नूतनीकरणासाठी अर्ज केले नाहीत.

> आकाशचिन्ह विभागाच्या वतीने गेल्या काही दिवसांत अनधिकृत जाहिरात फलकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. बाह्य जाहिरात धोरण निश्चित करण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षांत १७ कोटींचे टार्गेट असताना १८ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. आगामी आर्थिक वर्षांत १९ कोटीचे उदिष्ट देण्यात आले आहे. अनधिकृत फलकांवर कारवाई पुन्हा सुरू करणार आहोत.
>
> **- प्रदीप ठेंगल, सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# पाटबंधारेच्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्यांना झळा

## वितिरिका क्र 48, 49, 50 ला खडकवासला कालव्याद्वारे पुन्हा दोन दिवस अवर्तन न सोडल्यास आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

पाटबंधारे खात्याच्या गलथान कारभारामुळे कळस (ता. इंदापूर) परिसरातील शेतकऱ्यांचा ऐन उन्हाळ्यात झळा बसू लागल्याने येथील लाभधारक शेतकऱ्यांमधून तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केली जात आहे. वितिरिका क्र 48, 49, 50 ला खडकवासला कालव्याद्वारे पुन्हा दोन दिवस अवर्तन न सोडल्यास शेतकऱ्यांन समवेत आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा येथील कर्मयोगी साखर कारखान्याचे माजी संचालक बाबा महाराज खारतोडे यांनी दिला आहे.

तालुक्यातील हजारो एकरांवरील क्षेत्र बागायती झाले आहे. मग आमच्या वाट्याचे पाणी मुरले कुठे? असा संतप्त सवालही खारतोडे यांनी दै. प्रभातच्या प्रतिनिधीशी बोलताना आज व्यक्त केला. खडकवासला कालव्याद्वारे आवर्तन सोडल्यानंतर येथील



### इंदापूरला वेगळा न्याय

» इतर तालुक्याला नियम वेगळा आणि इंदापूर तालुक्यासाठी वेगळा असा नेहमी दुजाभाव का? असाही प्रश्न येथील लाभधारक शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे. इंदापूर तालुका हा शेवटच्या टोकाला असल्याने कालव्याच्या पाण्यासाठी येथील लाभधारक शेतकऱ्यांना कायमचाच संघर्ष करावा लागत असल्याने कालव्या लगतच्या लाभधारक शेतकऱ्यांमधून तीव्र स्वरूपाची नारी व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या, ग्रामपंचायत प्रशासनाने या अगोदर गावातील उद्भवणारी पाण्याची परिस्थिती लक्षात घेता या संबंधित विभागाला गावातील सर्व पाझर तलाव पाण्याने भरून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती; मात्र या मागणीला संबंधित अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवल्याने येथील लाभधारक शेतकऱ्यांन मधुन तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केली जात आहे.

खडकवासला कालव्याचे संबंधित अधिकारी व खासगी यंत्रणा यांनी परिसरातील वितिरिका क्र. 48, 49, 50 ला खडकवासला कालव्याचे अवर्तन सोडून नुसता दिखावा केल्याने हजारो एकरांवरील ऊसासह इतर पिके अक्षरशः शेतकऱ्यांनाच्या डोळ्या समोरून पाण्याअभावी जळून चालली आहेत. त्याच प्रमाणे जनावरांचा व माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नदेखील गंभीर बनला आहे. महावितरणने देखील अझवर्तन काळात कालव्या लगतचे रोहित्र बंद करून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिल्याची येथील शेतकऱ्यांची तक्रार आहे. जलसंपदा खात्याने कोणत्या वितरिकांना किती पाणी सोडले व किती क्षेत्राला पाणी दिले हे सांगावे? असाहह प्रश्न येथील शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

> एकीकडे खडकवासला कालव्यावरील वितरीकांना पाणी देण्याचे पाटबंधारे विभागाने जाणीवपूर्वक टाळले आहे. तर दुसरीकडे कालव्यातून पाणी घेणाऱ्यांना नाहक त्रास देऊन पाणी घेण्यास रोखले आहे. महावितरणच्या मदतीने बेकायदेशीरपणे सिंगलफेजींग वीज पुरवठा बंद ठेवून नागरिकांच्या अडचणीत वाढ केली. वास्तविक कालव्याचे आवर्तन फक्त दिखाव्यासाठीच सोडल्याचे स्पष्ट झाले आहे. इंदापूरच्या शेतकर्यांना नेमके किती पाणी दिले व त्यातून किती क्षेत्राचे सिंचन झाले याचे स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे. पाटबंधारे विभागाने यंदा इंदापूरकरांच्या वाट्याचे एक आवर्तन कमी केले आहे. यामुळे शेतकरी संतापले आहेत. वितरीकांना तातडीने पाणी न सोडल्यास शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.
>
> - विजय गावडे, अध्यक्ष बळीराजा प्रतिष्ठान

# केळद येथील 65 लाखांची जलजीवन योजना अर्धवट; प्रशासन सुस्त, ग्रामस्थ त्रस्त

## जुन्या योजनेच्या पाण्यावर ऐन उन्हाळ्यात ग्रामस्थांना कशीबशी तहान भागवावी लागत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राजगड तालुक्यातील तोरणागडाच्या खोऱ्यातील दुर्गम केळद येथे 65 लाख रुपये खर्च करून राबविण्यात येत असलेल्या जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम दोन वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहे. ग्रामस्थांनी वांरवार विनंती करून देखील योजनेच्या जलवाहिनीचे काम अर्धवट अवस्थेत खितपत पडले आहे. त्यामुळे जुन्या योजनेच्या पाण्यावर ऐन उन्हाळ्यात ग्रामस्थांना कशीबशी तहान भागवावी लागत आहे. याबाबत प्रशासन सुस्त आहे, तर ग्रामस्थ अपुऱ्या पाण्यामुळे त्रस्त झाले आहेत.

तीन वर्षांपूर्वी पाणी योजनेचे काम जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने सुरू केले. सुरुवातीला ठेकेदाराने वेगाने काम करून पाण्याची टाकी उभारली तसेच काही जलवाहिनी



देखील बसविल्या. मात्र, गेल्या वर्षांपासून मुख्य जलवाहिनीचे काम अर्धवट अवस्थेत आहे. असे असताना गावात अंतर्गत जलवाहिन्यांना नळजोडणी देण्याचे काम सुरू केले आहे.

जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम दोन वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहे. ग्रामस्थांनी वांरवार विनंती करून देखील योजनेच्या जलवाहिनीचे काम अर्धवट अवस्थेत खितपत पडले आहे. त्यामुळे जुन्या योजनेच्या पाण्यावर ऐन उन्हाळ्यात ग्रामस्थांना कशीबशी तहान भागवावी लागत आहे. याबाबत प्रशासन सुस्त आहे, तर ग्रामस्थ अपुऱ्या पाण्यामुळे त्रस्त झाले आहेत. दोन वर्षांपूर्वी जलजीवन योजनेची पाण्याची टाकी उभारली आहे. मात्र, जलवाहिनी अर्धवट असल्याने टाकीत पाण्याचा थेंबही पडत नाही. टाकी कोरडी ठणठणीत आहे. मुख्य जलवाहिन्याचे काम अगोदर पूर्ण करण्यात यावे आणि नंतर अंतर्गत नळजोडणी देण्याचे काम करण्यात यावे, अशी मागणी केळदचे माजी सरपंच व राजगड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष रमेश शिंदे यांनी केली आहे. जलजीवन योजनेच्या अर्धवट कामाबाबत रमेश शिंदे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच पुरवठा विभागाकडे तक्रार केली आहे.

> केळद गाव व परिसरातील रहिवाशांना पुरेसे पाणी मिळावे यासाठी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू केले. मात्र, अधिकारी व ठेकेदारांच्या हालगर्जीपणामुळे दोन वर्षांपासून या योजनेचे काम अर्धवट अवस्थेत आहे. योजनेचे 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. दोन वर्षांपासून वारंवार विनंती करून देखील जलवाहिनीचे काम पूर्ण केले नाही.
>
> - रमेश शिंदे, माजी सरपंच, केळद

> केळदच्या पाणी योजनेच्या टाकीचे काम चांगल्याप्रकारे झाले आहे. मात्र, जलवाहिनी टाकण्यासाठी काही नागरिकांनी विरोध केला. त्या वादामुळे काही काम अर्धवट आहे. याबाबत येत्या दोन-तीन दिवसांत ग्रामस्थांची बैठक घेऊन तोडगा काढण्यात येणार आहे. सर्वत्र जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर गावाला जलजीवन योजनेचे पाणी मिळणार आहे.
>
> - चेतन ठाकूर, शाखा अभियंता, पाणीपुरवठा विभाग, राजगड